**प्रेसनोट दिनांक २६/०६/२०१९**

**"जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनी पुणे पोलीसांचे अंमली पदार्थाचे दुष्परिणामाबाबत जनजागृती दिंडीचे आयोजन"**

सन १९८७ पासुन २६ जुन हा दिवस **"जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन"** म्हणुन जगभर साजरा केला जातो. त्या दिवसाचे व पुण्यनगरीत येणारे संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखीचे औचित्य साधुन पुणे शहर पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे यांचे वतिने अंमली पदार्थांचे दुष्परिणांमाबाबत जनजागृती दिंडीचे आयोजन करण्यात आले. सदर दिंढीत श्री राजेंद्र भिडे, श्रीमती नेहा दामले, सदस्य महाराष्ट्रीय मंडळ, योगेश रहाणे वेंगनिकॉम, पुणे श्री. राहुल पणशिकर शॉर्ट ॲड फिलम निर्माते, श्री अक्षय उगले, प्राध्यापक मॉडर्न कॉलेज पुणे यांनी त्यांचे शालेय/महाविद्यालयिन सुमारे १५० विद्यार्थ्यासह सहभाग घेतला.

या निमीत्ताने मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते **'SAY NO TO DRUGS'** या शॉर्ट फिलमचे अनावरण होवुन, विठ्ठलाचे मुर्ती पुजन व दिप प्रज्वलन करुन, अंमली पदार्थ रोधनास विरोध दर्शविणारे अनोखी दिंडीचे प्रस्थान केले. सदरची दिंढी साधु वासवानी मार्ग, डॉ. आंबेडकर मार्ग, ईस्ट स्ट्रीट, एम जी रोडने फिरुन त्या दिंडीतुन, अंमली पदार्थांचे सेवनास विरोध दर्शविणारे वेगवेगळे फलाय कार्डस,बॅनर्स, फडकविण्यात आले. दिंडीचे पोलीस आयुक्तालयात समारोप केला. सदर कार्यक्रम मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. अशोक मोराळे मा. पोलीस उप आयुक्त,गुन्हे श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.सहा पो आयुक्त. गुन्हे श्री. भानुप्रताप बर्गे, यांचे उपस्थीतीत पार पाडण्यात आला. सदर दिंडीत कै.कॅप्टन शिवरामपंत दामले प्रशाला, मॉर्डन लॉ कॉलेज, वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीटयुट ऑफ कॉ-ऑपरेटिव्ह मॅनेजमेन्ट या शाळा-कॉलेज मधील विदयार्थ्यांनी सहभाग घेतला.

मा. पोलीस आयुक्त यांनी पुणे शहरात अंमली पदार्थाचा अवैध व्यापार करणाऱ्यांचे समुळ उच्चाटन करुन,पुणे शहर नो ड्रग झोन करण्याचा निर्धार घेतला.


२६ जुन २०१९
जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन
पुणे शहर पोलीस दलातर्फे आयोजित
DRUG AWARENESS
Say 'NO' To 'DRUGS'
One life - One chance - Avoid 'Drugs'
Be educated on the causes and effects of 'Drug Addiction'!
पुणे शहर पोलीस
Be Smart, Don't Start!
नशापासून रहा दूर; जीवन सुख मिळवा भरपूर
नशा जानलेवा है आज ही छोड़ें
MH12 FD1249


पुणे पोलीस


प्रत्येक व्यसन, मृत्यूचे दालन.
आयुष्य संपवण्यापेक्षा धुम्रपान संपवणं कधीही चांगलं..
व्यसन म्हणे जिवंत व्यसन सोडा फुलेल
आयुष्य संपवण्यापेक्षा
प्रत्येक व्यसन मृत्यूचे दालन.